जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ३५०

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.२२/०२/२०२४
## दि.२१/०२/२०२४ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सिंहगड पो.स्टे.१११/२०२४,भादविक ३०२,३४ महा.पोलीस कायदा कलम ३७(१) सह १३५ |
| **फिर्यादी** | साहिल तुपे वय १९ वर्षे रा.धायरी,पुणे |
| **आरोपीत** | दोन इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २०/०२/२०२४ रोजी रात्रौ २०/३० वा.चे सुमारास खंडोबामाळ टेकडीरोड,रायकर मळा म्हशीचे गोठया जवळ,धायरी,पुणे येथील नव्याने काम सुरु असलेल्या पोल्ट्रीचे पत्र्याचे शेडमध्ये |
| **तपशिल** | यातील फिर्यादी याचा मित्र नामे राजु ऊर्फ आदित्य जनार्दन पोकळे वय २० वर्षे रा.पदमावती मंदीराचे पाठीमागे,धायरी,पुणे याचा आतेभाऊ यातील नमुद इसम व त्याचा मित्र यांनी वडिलोपार्जित जागेच्या वादावरुन व राजु पोकळे याने त्याचा आतेभाऊ नमुद इसम यास उसने दिलेले १० लाख रुपये परत मागतिलेचे कारणावरुन यातील नमुद इसम यांनी त्यांचे हातातील धारदार हत्याराने राजु पोकळे यांच्या डोक्यावर,मानेवर व डावे खांद्यावर वार करुन,जिवे ठार मारुन त्याचा खुन केला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी.प्रविण जाधव,मो.नं.८७८८८३१६३० |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो.स्टे.३१८/२०२४,भादविक ३०४ (अ),२८८,३४ |
| **फिर्यादी** | पुत्तनलाल प्रजापती,वय ३२ वर्षे,रा.फुरसुंगी गांव,पुणे |
| **आरोपीत** | बांधकाम कॉन्ट्रॅक्टर व सेंट्रींग ठेकेदार (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २०/०२/२०२४ रोजी सकाळी ०८/४५ वाचे सुमारास ग्रीन पार्क,फेज-१,छत्रपती शिवाजी महाराज पुतळयाचे जवळ,फुरसुंगी गांव,हडपसर, पुणे |
| **तपशिल** | यातील नमुद इसम यांनी त्याचे वर नमुद ठिकाणी चालु असलेल्या बांधकाम साईटवरील,मजुर कामगारांकडुन काम करवुन घेत असताना,कामगारांचे जिवीताचे व सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातुन त्यांना हेल्मेट,सुरक्षित जाळी,सेफ्टी बेल्ट इत्यादी योग्य ती साधनसामुग्री पुरविणे आवश्यक असताना,त्यांना तशी कोणतीही सुरक्षित साधने न पुरविता,तसेच उघडया डक्टवर योग्य ती साधन ठेवण्याची सोय न करता,हलगर्जीपणा व निष्काळजीपणा केल्यामुळे,यातील बिगारी कामगार फिर्यादी यांचा चुलत भाऊ ज्ञानबाबू छन्गालाल प्रजापती वय ४४ वर्षे रा.ग्रीन पार्क,फेज-१,फुरसुंगी गांव,हडपसर,पुणे हा इमारतीच्या १० व्या मजल्यावरील डक्ट मध्ये काम करताना खाली पडून झालेल्या दुखापतीमुळे मयत झाला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.पवार हडपसर मो.नं.८७८८२३२४१९ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विमानतळ पो.स्टे.८७/२०२४,भादविक ३९२,३४ |
| **फिर्यादी** | एक महिला वय ४६ वर्षे,रा.कर्वेनगर,पुणे |
| **आरोपीत** | मोटार सायकलवरील दोन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक १९/०२/२०२४ रोजी रात्री २३/१० वा.चे सुमारास फिनिक्स मॉल,विमाननगर येथील साऊथ गेटचे समोर |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया साऊथ गेटचे समोर उभे असताना,नमुद इसमांनी दुचाकीवरून |

| | |
|---|---|
| | त्यांचेजवळ येवुन,फिर्यादी यांचे हातातील ९०,०००/- रूपये किंमतीचा मोबाईल जबरी चोरी करून नेला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.विशाल शिंदे मो.नं.७३५०६८३४४९ |
| **४** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सिंहगड पो.स्टे.११०/२०२४,भादविक ३०४ (अ)सह मो.वा.का.कलम ११९/१७७,१८४ |
| **फिर्यादी** | समीर श्रीरंग देशमुख पोलिस अमंलदार सिंहगड पो.स्टे.पुणे शहर |
| **आरोपीत** | बुलेट चालक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २०/०२/२०२४ रोजी सायं.१९/०० वा.चे.सुमा.मानाजीनगर सेल्फी पॉईन्ट न-हे पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने त्याचे ताब्यातील बुलेट ही वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी पायी रस्ता क्रॉस करणारे शत्रुघ्न नथु भगत वय ६४ वर्ष रा.मु.पो.नहरवाडी ता.कोरेगाव जि.सातारा यांस जबर ठोस मारून,गंभीर जखमी करून,त्याचे मृत्युस कारणीभुत झाला. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी राहुल यादव मो.नं.९५५२१६०७२० |
| **५** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो.स्टे.३२०/२०२४,भादविक ३०४(अ),२७९,मो.वा.का.कलम ११९/१७७ |
| **फिर्यादी** | केतन शिंदे,वय २० वर्षे,रा.हडपसर पुणे |
| **आरोपीत** | टॅम्पो वरील चालक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २१/०२/२०२४ रोजी रात्री २१/०० वा.चे सुमारास बीआरटी पीएमटी बस स्टॉप पुणे सोलापुर रोड,वैदवाडी हडपसर पुणे येथे सार्वजनिक रस्त्यावर |
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने त्याचे ताब्यातील टॅम्पो हा वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी पायी रस्ता क्रॉस करणारे निरंजन पांडुरंग जाधव वय ४७ वर्ष रा.शंकरमठ,आलकुंटे वस्ती,दत्त मंदिराचे शेजारी हडपसर पुणे यांस जबर ठोस मारून,गंभीर जखमी करून,त्याचे मृत्युस कारणीभुत झाला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी,दिपक बर्गे मो.नं.९५९४९६६८६७० |
| **६** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो.स्टे.१०३/२०२४,भादविक २२४ |
| **फिर्यादी** | गोविंद पंढरीनाथ जायभाये, पो.अमंलदार येरवडा पोलीस स्टेशन पुणे शहर |
| **आरोपीत** | सिध्दार्थ संजय भालेराव, वय २१ वर्षे रा मु.पो.इनामगाव, ता.शिरूर,जि.पुणे (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २१/०२/२०२४ रोजी रात्रौ ०२/३४ वा.चे.सुमारास पोलीस स्टेशनचे प्रवेश व्दाराजवळ |
| **तपशिल** | येरवडा पोलीस ठाणे, गु.र.क्र.१००/२०२४ मधील दोषी ठरविण्यात आलेला आरोपी व कायदेशीररीत्या ताब्यात घेण्यात आलेला आरोपी नामे सिध्दार्थ संजय भालेराव, वय २१ वर्षे यास कायदेशीर ताब्यात घेतले असताना व सुरक्षिततेकामी फिर्यादी यांचे ताब्यात असताना तो येरवडा पोलीस ठाणे प्रवेश व्दाराजवळून पळून गेला आहे, |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.स्वप्नील पाटील मो.नं.९९७५३६३७०३ |
| **७** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सिंहगड पो.स्टे.११३/२०२४,भादविक ४२७,५०४,५०६,३४ मपोअधि.कलम ३७(१) सह १३५ क्रिमीनल लॉ अमेंटमेट कलम ७ |
| **फिर्यादी** | नाना भुसे वय ३२ वर्षे रा.न-हे पुणे |
| **आरोपीत** | तीन ते चार अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २१/०२/२०२४ रोजी पहाटे ०४/३० वा,सुमारास वैष्णव भवन नवसकरवस्ती सिंहगड कॉलेज न-हे पुणे येथील सार्वजनिक रस्त्यावर |
| **तपशिल** | यातील फिर्याद यांनी त्यांची कार ही रस्त्याचे बाजुला लॉक व पार्क करुन ठेवलेली असताना यातील नमुद इसम हे टुव्हीलर वरुन हातामध्ये लोंखडी रॉड घेवुन येवुन जोर जोरात आरडा ओरडा करुन त्याच्या हातामधील लोखंडी रॉडने फिर्यादीचे गाडीचे पाठीमघील काचेवर मारुन काच फोडुन नुकसान करुन फिर्यादी यांचे गाडीचे आजु बाजुला पार्क केलेल्या दोन कार एक टेम्पो व दोन रिक्षा यांच्या सुध्दा काचा फोडुन नुकसान करुन "एका एकाला जीवंत सोडणार नाही असे म्हणुन त्याच्या हातातील लोखंडी रॉड हवेत फिरवत कोणी आमच्या नादाला लागु नका आम्ही येथिल भाई आहोत" असे म्हणुन हातातील लोंखडी रॉड हवेत फिरवुन दहशत पसरवुन जोर-जोरात आरडा ओरडा शिवीगाळ करुन टुव्हीलर वरुन निघुन गेले आहेत, |
| **त.अंमलदार** | म.पो.उप.निरी.अस्मिता लाड,मो.नं.८८३०५९७४४१ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**